<u>दिवाणी किरकोळ अर्ज क. 688/2022 मधील नि. 1 वरील आदेश</u>
**उर्मिला वि. प्रियंका व इतर**
**[CNR NO. MHBI-0800-1598-2022]**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा 1827 कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. अर्जदारांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे.

अर्जदार क्र.1 मयताची पत्नी, अर्जदार क्र. 2 ते 4 मयताची मुले व गैरअर्जदार ही मयताची आई आहे. अर्जाच्या कलम क्र. 6 मधील इतर वारस मयताची आई आहे. मयत **हनुमान बाबासाहेब शिंदे** यांचा मृत्यू **दि.14.05.2021** रोजी खेर्डा खु., माजलगांव ता. माजलगाव, जि. बीड येथे झालेला आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी **दि. 08.02.2023** रोजी दै. माजलगाव टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन (नि.क्र. 10)दिले होते. परंतु कोणीही आजपर्यंत आक्षेप नोंदविला नाही. नि.क्र. 12 येथे इतर वारसदारतर्फे वकिलपत्र दाखल केले.

4. युक्तिवाद ऐकला. अर्जदारांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र. 8), मयताचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र. 9), अर्जदाराचे आधारकार्ड (नि.क्र. 4 लगत), अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार, गैरअर्जदार व परिच्छेद 6 मधील इतर वारस हे मयताचे वारस आहेत हे सिध्द होते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
2) अर्जदार व परिच्छेद 6 मधील इतर वारस हे मयत **हनुमान बाबासाहेब शिंदे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस–प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
3) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिल्यावर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2024.07.25 12:02:17 +0530

दिनांक : 09.07.2024
ठिकाण : माजलगाव.

**( र.आ.सावंत )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
माजलगाव.

**CERTIFICATE**

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order"

| | |
|---|---|
| Dictated on | 06-01-2024 |
| Transcribed On | 06-01-2024 |
| Checked & signed on | 06-01-2024 |

Sd/-
( P.P.Andurkar )
Steno Gr-III,
Jt.C.J.J.D. Majalgaon.